# नागपूर महानगरपालिका, नागपूर

(स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 37/ज.स./2015 — दि. 29/04/2015

**<u>अर्ज स्विकारण्यांचा शेवटचा दि. 15/05/2015 पर्यंत सायंकाळी 05.00 वा. पर्यंत</u>**

नागपूर शहरात राबविण्यात येणा–या राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत **11 महिन्याकरीता करार पध्दतीवर** नागपूर महानगरपालिका, नागपूर येथे **पुर्णतः कंत्राटी स्वरूपात पदे भरण्याकरीता** खालील संवर्गातील पदासमोर दर्शविलेली अर्हता धारण करणा–या पात्र उमेदवारांकडून विहीत नमून्यात **ऑनलाईन** अर्ज मागविण्यांत येत आहे. सदर पदे शासन अनुदानीत पदे असुन सद्यस्थितीत 6 महिन्याचे शासन अनुदान उपलब्ध आहे. शासन अनुदान उपलब्धतेपर्यंतच सदर पदे कंत्राटी स्वरूपात कार्यरत राहतील.

## <u>भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील</u>

| अ क्र | पदाचे नांव | पद संख्या | अ जा | अ ज | वि जा (अ) | भ ज (ब) | भ ज (क) | भ ज (ड) | वि मा प्र | इ मा व | मु क्त | मुळ शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा (दि. 01/05/2015 ला) | एकमुस्त प्रतिमाह वेतन रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | स्टॉफ नर्स (Nurse Midwife) | 77 | 7 | 6 | 3 | 0 | 3 | 1 | 2 | 15 | 40 | GNM Course (with 12th pass) Registration with MNC | किमान 18 वर्षे कमाल 38 वर्षे | रू. 9000/– | पूर्ण वेळ |
| 2 | ए. एन. एम. (A.N.M.) | 93 | 10 | 6 | 3 | 1 | 3 | 2 | 0 | 13 | 55 | ANM Course (with 10th pass) Registration with MNC | | रू. 7500/– | पूर्ण वेळ |
| 3 | लॅब टेक्नीशियन (LabTechnician) | 29 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 5 | 14 | D.M.L.T. (with B.Sc) | | रू. 7000/– | पूर्ण वेळ |
| 4 | फार्मसिस्ट (Pharmacist) | 29 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 5 | 14 | D. Pharm or B. Pharm (after 12th) | | रू. 8000/– | पूर्ण वेळ |
| 5 | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट (DEO cum Accountant) (NUHM City Level Staff) | 01 | | | | | | | | | | M.Com with tally ERP-9 and Computer knowledge, Marathi & English Typing Required. 2 Yrs Experience in accounting Marathi & English Typing. | | रू. 9600/– | पूर्ण वेळ |
| 6 | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अकाऊंटंट (DEO cum Accountant) (NUHM UPHC Staff) | 12 | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 6 | B. Com, MS-CIT, Marathi & English 30 wpm Typing. Experience in accounting with Marathi & English Typing. | | रू. 8000/– | पूर्ण वेळ |
| 7 | अटेंडंट(Attendent) | 27 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 5 | 13 | 7th Std pass | | रू. 6000/– | पूर्ण वेळ |
| 8 | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) | 08 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | MBBS | किमान 18 वर्षे कमाल 45 वर्षे तसेच सेवानिवृत्त शासकीय अधिकारी असल्यास वयोमर्यादा 62 वर्षे पर्यंत राहील. | रू. 40000/– | पूर्ण वेळ |
| 9 | वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) | 09 | | | | | | | | | | MBBS | | रू. 24000/– | अर्ध वेळ |
| 10 | स्त्री रोग तज्ञ (Gynecologist) | 07 | | | | | | | | | | MD(Gyn.) or D.G.O. (After MBBS) [MD will be preferred. | | रू. 2000/– /Visit | अर्ध वेळ |
| 11 | बालरोग तज्ञ (Pediatrician) | 07 | | | | | | | | | | MD(Ped.)or D.C.H. (After MBBS) [MD (Ped.) will be preferred.] | | रू.2000/– /Visit | अर्ध वेळ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12 | औषधी तज्ञ (Physician) | 03 | | | | | | | | | | MD (Med.) (After MBBS) | | रू. 2000/— /Visit | अर्ध वेळ |
| 13 | भूल तज्ञ (Anesthetist) | 02 | | | | | | | | | | MD (Ane.) or D. A. (After MBBS) [MD (Ane.) will be preferred.] | | रू. 2000/— Visit | अर्ध वेळ |

## 1) पात्रतेच्या अटी व शर्ती :—

1) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

2) एका पदासाठी फक्त एकच अर्ज विचारात घेण्यात येईल.

3) उमेदवारांनी जाहीरातीत नमूद पदासाठी स्वतंत्रपणे पदनिहाय **ऑनलाईन अर्ज** सादर करावा. ऑनलाईन स्वरूपाव्यतिरीक्त इतर मार्गाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

4) सदरील पदे ही शहरी आरोग्य सोसायटी, (City Health Society) म.न.पा. नागपूर यांच्या अंतर्गत **निव्वळ कंत्राटी** स्वरूपाची राहतील. त्यांच्या नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेशी कसल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.

5) वरील सर्व पदे ही कंत्राटी पध्दतीने भरण्यात येत असल्याने यास शासकीय सेवा भरतीचे नियम लागु होणार नाहीत

6) एकुण पदांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो.

7) सदरील पदे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ प्रकल्प कालावधीपुरते भरावयाचे असुन प्रकल्प बंद होताच सदर पदे आपोआप संपूष्टात येतील.

8) मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी ऑनलाईन स्वरूपात प्रसिध्द झाल्यानंतर मुलाखतीस पात्र उमेदवारांनी खालील कागदपत्रासह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे.

- पासपोर्ट साईज फोटो—2.
- जन्म तारखेकरीता (वयाचा दाखला/10 वीची टी.सी./जन्म प्रमाणपत्र).
- फोटो आयडी—मतदान ओळखपत्र/आधार कार्ड इत्यादी.
- रहीवाशी प्रमाणपत्र.
- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र शेवटच्या वर्षाची गुणपत्रीका, अतिरीक्त शैक्षणिक पात्रता असल्यास प्रमाणपत्र.
- अटेडंट या पदाकरीता फक्त 7 व्या वर्गात प्राप्त गुण अर्हतेसाठी विचारात घेण्यात येतील. त्यामुळे या पदाकरीता 7 व्या वर्गाची गुणपत्रीका अपलोड करून 7 व्या वर्गाचे प्राप्त गुण अर्जात देणे आवश्यक राहील.
- रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.
- फक्त शासकिय/निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्था/राष्ट्रिय आरोग्य मिशन येथील अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्र.
- बॅक ऑफ महाराष्ट्र, येथे ''महानगरपालिका, नागपूर'' चे बचत खाता क्र. 60203795136 मध्ये ''महानगरपालिका नागपूर'' या नावाने शुल्क भरल्याची प्रत किंवा ऑनलाईन शुल्क भरण्याची प्रत व ऑनलाईन स्वरूपात भरलेल्या अर्जाची प्रत. (प्रिंट कॉपी)
- मुलाखतीच्या अनुषंगाने इतर कागदपत्र मुळ व सत्यप्रत साक्षांकित प्रतचा एक संच.

9) उमेदवाराने ऑनलाईन स्वरूपात अर्ज करतांना खालीलप्रमाणे कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

अ) नुकताच काढलेला फोटो.
ब) जात प्रमाणपत्र
क) जन्म प्रमाणपत्र
ड) पदाकरीता लागणारी मुळ शैक्षणिक अर्हतेची शेवटच्या वर्षाची गुणपत्रीका.
इ) लागु असल्यास सेवानिवृत्तीचे प्रमाणपत्र

10) छाननी अंती मुलाखतीस पात्र ठरणा—या उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.nmcnagpur.gov.in) संबंधीत उमेदवारांनी वेळोवेळी म.न.पा.चे संकेतस्थळावर याबाबत अवलोकन करीत रहावे.

11) रिक्त पदांचे पाच पटीपेक्षा जास्त अर्ज आल्यास छाननी अंती एका पदास पाच (1:5) उमेदवार याप्रमाणे पदानुसार पदवी/पदविका/जीएनएम/एएनएम कोर्स/फार्मसिस्ट/लॅब टेक्नीशियन/बी. कॉम, एम.कॉम इत्यादी मुळ शैक्षणिक पात्रतेच्या अंतीम वर्षाच्या परीक्षेतील गुणवत्तेनुसार मुलाखतीसाठी गुणांचा कट ऑफ लावुनच पात्र उमदेवारांना एकास पाच (1 : 5) याप्रमाणे मुलाखतीस बोलाविण्यात येईल, अशा पात्र उमेदवारांची यादी म.न.पा.च्या संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in वर प्रसिध्द करण्यात येईल. **यासाठी वेगळे मुलाखतपत्र पाठविण्यात येणार नाही.** अर्जदारांनी वेळोवेळी म.न.पा. संकेतस्थळावरच याबाबत अवलोकन करणे अपेक्षित आहे.

12) आवेदनपत्र स्विकृत/अस्विकृत करण्यांचे अधिकार, निवड प्रक्रियेत वेळेवर होणारे बदल करण्यांचे तसेच त्याबाबत अंतीम निर्णय घेण्यांबाबतचे संपूर्ण अधिकार आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांच्याकडे राखुन ठेवलेले आहे.

13) कोणत्याही वेळेस भरती/निवड प्रक्रिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार शहरी आरोग्य सोसायटी म.न.पा. नागपूर यांना राहतील. त्यावर कोणताही उजर घेता येणार नाही.

14) नियुक्तीबाबतचा अंतीम अधिकार अध्यक्ष तथा आयुक्त, शहरी आरोग्य सोसायटी,(CHS) , महानगरपालिका नागपूर यांनी राखुन ठेवला आहे.

## 2) <u>भरतीबाबत इतर आवश्यक सूचना</u> :–

1) जाहीरातकरीता अर्ज करावयाचा नमूना तसेच पदभरतीबाबतची संपूर्ण जाहीरात नागपूर महानगरपालिकेच्या www.nmcnagpur.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

2) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यांवर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

3) परिपूर्ण भरलेले अर्ज दिनांक 15/05/2015 (सांयकाळी 05.00 वाजेपर्यंत) पर्यंत ऑनलाईन स्वरूपातच भरण्यात यावे. ऑनलाईन अर्ज करतांना आवश्यक ती कागदपत्रे अपलोड (Upload) करण्यात यावीत. सदर मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज, विहीत वय व पात्रता धारण न करणा–या उमेदवारांचे अर्ज, विहीत नमुन्यात नसलेले अर्ज ,मजकुर अपूर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या साक्षांकित प्रती न जोडले अर्ज तसेच अन्य उणिवा असलेले अर्ज नाकारण्यांत येतील/विचारात घेतले जाणार नाहीत.

4) उमेदवारांने आपले परिपूर्ण भरलेले अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर भरावयाचे आहे. तसेच प्रशासकीय शुल्क रू. 100/– ऑनलाईन स्वरूपात किंवा बॅक ऑफ महाराष्ट्र चे बचत खाता क्रमांक 60203795136 मध्ये जमा''महानगरपालिका, नागपूर'' या खात्यात करून शुल्क जमा केल्याचा दिनांक अर्जात नमूद करावा. **बॅक ऑफ महाराष्ट्राचे खात्यात शुल्क जमा करतांना अर्जदाराने आपले नाव सुध्दा चालानमध्ये नमूद करावे**. ऑनलाईन पध्दती व्यतिरीक्त टपालाने किंवा इतर मार्गाने आलेले अर्ज कुठल्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

**हस्ता/– श्रावण हर्डीकर**
**आयुक्त/अध्यक्ष**
**निवड समिती (एन.यु.एच.एम)**
**महानगरपालिका, नागपूर**